आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१३ मे २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातल्या मतदानाला शांततेत प्रारंभ / सकाळी १ वाजेपर्यंत सुमारे ४० टक्के मतदान झाल्याचा अंदाज
- महाराष्ट्रातल्या ११ मतदारसंघात १ वाजेपर्यंत सुमारे ३१ टक्के मतदारांनी बजावला मतदानाचा हक्क
- पाचव्या आणि पुढच्या टप्प्यातल्या प्रचारासाठी राजकीय नेत्यांचे झंझावाती दौरे
- सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाचा बारावीचा निकाल जाहीर

**आणि**

- आयपीएल टी-ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आजचा सामना गुजरात टायटन्स आणि कोलकाता नाईट रायडर्समधे अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडीयमवर रंगणार

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातलं मतदान आज सकाळी ७ वाजल्यापासून सुरु झालं. नऊ राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशात लोकसभेच्या ९६ जागांसाठी आज हे मतदान होत आहे. आंध्र प्रदेशातल्या सर्व २५ जागा, तेलंगणातल्या सर्व १७ जागा, उत्तर प्रदेशात १३, महाराष्ट्रात ११, मध्य प्रदेश आणि पश्चिम बंगाल मधे प्रत्येकी आठ, तर बिहारमधे ५ जागांवर आज मतदान होत आहे. झारखंड आणि ओडिशातल्या प्रत्येकी ४ आणि केंद्रशासित प्रदेश जम्मू-काश्मीरच्या एका मतदारसंघाचाही या टप्प्यात समावेश आहे.

दुपारी १ वाजेपर्यंत ४० टक्क्यांहून अधिक मतदान झाल्याचा अंदाज आहे. **झालेल्या मतदानाची राज्यनिहाय आकडेवारी अशी आहे-**

पश्चिम बंगालमधे सुमारे ५२ टक्के, मध्य प्रदेशात साडे ४८ टक्के, उत्तरप्रदेश ३९ टक्क्यांहून अधिक, झारखंडमधे सुमारे ४४ टक्के, बिहारमधे ३४ टक्के तर महाराष्ट्रात सुमारे ३१ टक्के मतदान झालं. आंध्र प्रदेश आणि तेलंगणात प्रत्येकी ४० टक्के, तर ओदिशात ३९ टक्के मतदारांनी लोकसभा निवडणुकीसाठी मतदान केलं. जम्मू काश्मीरच्या एका मतदारसंघात आज मतदान होत असून तिथे १ वाजेपर्यंत सुमारे साडे २३ टक्के मतदारांनी मतदानाचं कर्तव्य पार पाडलं.

मतदान सकाळी ७ वाजता सुरू झालं असून ते संध्याकाळी ६ वाजता संपेल. मतदारांचा सहभाग वाढवण्यासाठी तेलंगणातील १७ मतदारसंघात काही ठिकाणी मतदानाची वेळ वाढवण्यात आल्याचं आयोगानं म्हटलं आहे. या टप्प्यात ८ कोटी ९७ लाख पुरुष आणि ८ कोटी ७३ लाख महिला मतदारांसह एकंदर १७ कोटी ७० लाखांहून अधिक मतदार मतदानासाठी पात्र आहेत.

लोकसभा निवडणुकीच्या आजच्या चौथ्या टप्प्यासाठी एकूण १ हजार ७१७ उमेदवार रिंगणात असून अनेक प्रमुख उमेदवारांचं भवितव्य ईव्हीएममध्ये बंद केलं जाईल.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या पुणे, शिरुर, मावळ, अहमदनगर, शिर्डी, नंदुरबार, जळगाव, रावेर, जालना, औरंगाबाद आणि बीड या ११ मतदारसंघात मतदार आज आपला हक्क बजावत आहेत. दुपारी १ वाजेपर्यंत राज्यात सुमारे ३१ टक्के मतदारांनी मतदान केलं.

**मतदारसंघ निहाय मतदानाची टक्केवारी याप्रमाणे आहे. -**

नंदुरबार - ३७ पूर्णांक ३३ शतांश टक्के, जळगाव-  ३१ पूर्णांक ७० शतांश टक्के, रावेर - ३२ पूर्णांक २ दशांश टक्के, जालना - ३४ पूर्णांक ४२ शतांश टक्के,

औरंगाबाद - ३२ पूर्णांक ३७ शतांश टक्के, मावळ - २७ पूर्णांक १४ शतांश टक्के, पुणे - २६ पूर्णांक ४८ शतांश टक्के, शिरूर - २६ पूर्णांक ६२ शतांश टक्के, अहमदनगर - २९ पूर्णांक ४५ शतांश टक्के, शिर्डी - ३० पूर्णांक ४९ शतांश टक्के, बीड - ३३ पूर्णांक ६५ शतांश टक्के

<><><><><>

औरंगाबाद लोकसभा मतदारसंघाचे विद्यमान खासदार सय्यद इम्तियाज जलील यांनी सहकुटुंब मतदान केलं. तर याच मतदारसंघातले महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे आणि महायुतीचे उमेदवार संदीपान भुमरे यांनीही मतदानाचा अधिकार बजावला. केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी भोकरदनमध्ये, मंत्री गुलाबराव पाटील यांनी जळगावमध्ये, मंत्री विजयकुमार गावित आणि नंदुरबारच्या महायुतीच्या उमेदवार हिना गावित यांनी नंदुरबारमध्ये मतदान केलं. माजी मंत्री के. सी. पाडवी आणि महाविकास आघाडीचे उमेदवार गोवाल पाडवी यांनीही मतदानाचा हक्क बजावला. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांनी अहमदनगरमध्ये मतदान केलं. ज्येष्ठ वैज्ञानिक रघुनाथ माशेलकर यांनी पुण्यात मतदान केलं.

राज्यात वयोवृद्ध मतदारांनीही मतदान केंद्रावर जात आपला मतदानाचा हक्क बजावला. ९८ वर्षांच्या लक्ष्मीबाई गराडे यांनी पिंपरी चिंचवडमध्ये मतदान केलं. नंदुरबार जिल्ह्यात नवापूर इथं ९९ वर्षांच्या इस्माईल मोहम्मद बदुडा यांनी तर नंदुरबार शहरात ८४ वर्षांच्या कमलबेन शहा यांनी मतदान केलं. नंदुरबारमध्येच दोन्ही डोळ्यांनी नेत्रहीन असलेले अतुल शहा यांनी मतदानाचा अधिकार बजावला. तर राज्यातल्या पहिल्या मतदार रेवता तडवी यांनी मनीबेली इथल्या मतदान केंद्रावर मतदान केलं.

राज्यात ठिकठिकाणी महिलांसाठी गुलाबी रंगात रंगलेली विशेष सखी मतदान केंद्र उभारण्यात आली आहेत.

जालना शहरातील जैन विद्यालयात तृतीय पंथीय मतदारांनी आज लोकसभासाठी प्रथमच मतदान केलं. त्यांनी आपल्या भावना या शब्दात व्यक्त केल्या……

**होल्ड- बाईट- तृतीयपंथी मतदार- जालना**

**<><><><><>**

श्रोतेहो, 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' या कार्यक्रमात आजच्या भागात आपण 'वायव्य मुंबई' लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

राज्यात निवडणुकीच्या पाचव्या आणि अखेरच्या टप्प्यातल्या प्रचारात वेग आला आहे. सर्व पक्षांच्या ज्येष्ठ नेत्यांच्या सभा राज्यात होत आहेत. भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज महायुतीचे उमेदवार सुभाष भामरे यांच्या प्रचारार्थ धुळ्यात सभा घेतली. काँग्रेसच्या काळात जगात ११ व्या क्रमांकावर असलेली अर्थव्यवस्था मोदींच्या काळात पाचव्या क्रमांकावर आली असल्याचं शहा यांनी सांगितलं. अयोध्येतलं राममंदिर निर्माण करण्यासाठी ६० वर्षे काँग्रेस आणि शरद पवार यांनी अडथळे आणल्याची टीका त्यांनी केली. मोदींच्या काळात देश सुरक्षित झाला असून, देशाचा विकास झाला असल्याचं ते म्हणाले. पालघरमध्ये हेमंत सावरा यांच्या प्रचारार्थ ते सभा घेणार आहेत.

**<><><><><>**

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज बिहारमध्ये प्रचार केला. उत्तर प्रदेशात वाराणसी इथं ते आज संध्याकाळी रोड शो करणार आहेत. प्रधानमंत्री मोदी उद्या वाराणसी लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

लोकसभेच्या पाचव्या टप्प्याच्या प्रचारासाठी महाविकास आघाडीची १७ मे रोजी वांद्रे कुर्ला संकुलात संयुक्त प्रचार सभा होणार आहे. या सभेला काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे शरद पवार यांच्यासह दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आपचे नेते अरविंद केजरीवाल सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

प्रत्यक्ष मतदानाची आकडेवारी मतदानानंतर २४ तासांच्या आत जाहीर करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला द्यावे अशी मागणी करणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात येत्या शुक्रवारी, १७ मे रोजी सुनावणी होणार आहे. लोकसभा निवडणुकीची मतदानाची आकडेवारी प्रकाशित करण्यासाठी निवडणूक आयोग विलंब करत असून, मतदानाच्या दिवशी जाहीर केलेल्या सुरुवातीच्या आकड्यांमध्ये आणि अंतिम आकड्यांमध्ये ५ टक्क्यांहून जास्त फरक असल्याचं या याचिकेत म्हटलं आहे.

**<><><><><>**

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाचे बारावीचे निकाल आज जाहीर झाले. या परीक्षेला बसलेले ८७ पूर्णांक ९८ शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण होण्याचं प्रमाण गेल्या वर्षापेक्षा ६५ शतांश टक्क्यांनी वाढल्याचं सीबीएसईनं

सांगितलं आहे. चोवीस हजार विद्यार्थ्यांनी ९६ टक्क्यांपेक्षा जास्त तर एक लाख सोळा हजार विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवले आहेत.

<><><><><>

मुंबईत मध्य रेल्वेवरच्या ठाणे स्थानकाजवळ आज सकाळी वाहतूक नियंत्रण प्रणालीत बिघाड झाल्यानं, कुर्ला ते कल्याण तसंच ट्रान्स हार्बर या मार्गांवरची रेल्वे सेवा विस्कळीत झाली.

<><><><><>

आयपीएल टी-ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज गुजरात टायटन्स आणि कोलकाता नाईट रायडर्सचा सामना होणार आहे. अहमदाबादमधल्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

<><><><><>

केंद्र सरकार दरवर्षी २३ प्रकारच्या पिकांच्या हमी भावाची घोषणा करतं. त्या धर्तीवर राज्य सरकार श्रीअन्न अर्थात भरड धान्याच्या ४ पिकांचे हमीभाव जाहीर करणार आहे, अशी माहिती राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष तसंच मुख्यमंत्री पर्यावरण आणि शाश्वत विकास कृती दलाचे कार्यकारी अध्यक्ष पाशा पटेल यांनी दिली.